मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९७ सातारा रविवार दि १४ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

विधान परिषदेतील विजयानंतर अजित पवार व शहा यांची खलबते

विधानसभा निवडणूक आणि मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा

मुंबई : विधान परिषद निवडणुकीत महायुतीने आपले सर्व उमेदवार निवडून आणत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने दिल्लीला रवाना झाले. गृहमंत्री आणि भाजपचे रणनीतीकार अमित शहा यांच्याशी त्यांची खलबते पार पडली. त्यानंतर ते तातडीने मुंबईला परतले आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचे घटक पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे सर्व म्हणजे भाजप ५ शिंदे गट आणि अजित पवार गट प्रत्येकी दोन असे उमेदवार निवडून आले. विधानसभा निवडणुकीत अपेक्षित कामगिरी करून न शकलेल्या महायुतीचा आत्मविश्वास विधान परिषद निवडणुकीत मिळवलेल्या विजयाने वाढला आहे. या निवडणुकीत शरद पवार आपल्या पुतण्याला धक्का देण्यासाठी त्यांच्या गटाची मते फोडतील, असा कयास बांधला जात होता. त्याचप्रमाणे भाजप आणि शिंदे गटाच्या मतांमध्येही फोटो पडण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात या निवडणुकीत काँग्रेसची साथ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची काही मते फुटून ती महायुतीच्या पारड्यात पडली आहेत.

विधान परिषद निवडणूक निकालानंतर लगेचच अजित पवार यांनी दिल्ली गाठली. त्यांनी अमित शहा यांची भेट घेऊन विधान परिषद निवडणुकीचा वृत्तांत कथन केला. त्याचप्रमाणे पवार आणि शहा यांच्यामध्ये आगामी विधानसभा निवडणूक आणि मंत्रिमंडळ विस्तार याबाबतही बंद दाराआड चर्चा झाली. यावेळी महायुतीच्या जागा वाटपाबाबतही चर्चा झाली असण्याची शक्यता आहे.

भाजपला धक्का; पोटनिवडणुकीत १३ पैकी दोनच ठिकाणी यश

नवी दिल्ली : सात राज्यांत विधानसभेच्या १३ जागांवरील पोटनिवडणुकीत विरोधकांच्या इंडिया आघाडीने दहा जागा जिंकल्या. भाजपला केवळ दोन ठिकाणी विजय मिळाला. तर बिहारमध्ये अपक्ष उमेदवाराची सरशी झाली. लोकसभा निकालानंतर भाजपसाठी हा धक्का मानला जातो.

पश्चिम बंगालमधील सर्व चार जागा सत्तारूढ तृणमूल काँग्रेसकडे गेल्या. विशेष म्हणजे यातील तीन जागा यापूर्वी भाजपकडे होत्या. मात्र आमदारांनी पक्ष बदलल्याने येथे पोटनिवडणूक झाली. रायगंज, रानघाट दक्षिण, बागडा तसेच मनिकटला या चारही मतदारसंघात ५० हजारांहून अधिक मताधिक्याने तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांनी विजय मिळवला. त्यावरून राज्यातील

पक्षाचे यश लक्षात येते.

बिहारमध्ये प्रमुख पक्षांना धक्काबिहारच्या रुपैली मतदारसंघात अपक्ष शंकर सिंह विजयी झाले. त्यांनी संयुक्त जनता दलाच्या कलाधर प्रसाद मंडल यांचा पराभव केला. येथे राष्ट्रीय जनता दलाचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर गेला. तमिळनाडूत द्रमुकने मोठ्या फरकाने विक्रवंडी मतदारसंघातील जागा राखली. येथे प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या अण्णा द्रमुकने निवडणुकीत भाग घेतला नव्हता. पंजाबच्या जालंधर पश्चिम मतदारसंघात सत्तारूढ आम आदमी पक्षाच्या मोहिंदर भगत यांनी भाजपच्या शीतल अंगरुल यांचा पराभव केला. त्यांनी आपचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासाठी हा निकाल महत्त्वाचा आहे. पंजाबमध्ये लोकसभा निवडणुकीत आपची कामगिरी चांगली झाली नव्हती. त्यामुळे हा विजय त्यांच्यासाठी महत्त्वाचा ठरला.

पोटनिवडणूक निकाल

तृणमूल काँग्रेस ४

काँग्रेस ४

भाजप २ द्रमुक,

आप,अपक्ष प्रत्येकी १

मुख्यमंत्र्यांच्या पत्नी विजयी

हिमाचल प्रदेशातील तीन जागांपैकी सत्तारूढ काँग्रेसला दोन तर भाजपला एक जागा मिळाली. मुख्यमंत्री सुखविंदरसिंह सुख्खू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर यांनी डेहरा मतदारसंघात भाजप उमेदवार होशियार सिंह यांचा ९ हजार मतांनी पराभव केला. नलगड येथील जागाही काँग्रेसला मिळाली. भाजपला केवळ हमीरपूर मतदारसंघात यश मिळाले.

उत्तरखंडमध्ये काँग्रेसची सरशी

उत्तराखंडमध्ये बद्रीनाथ व मंगलौर या दोन्ही ठिकाणी काँग्रेसने विजय मिळवत सत्तारूढ भाजपला धक्का दिला. लखपालसिंह बुटाला यांनी बद्रीनाथ मतदारसंघात माजी मंत्री व भाजप उमेदवार राजेंद्रसिंह भंडारी यांचा पाच हजार मतांनी पराभव केला. तर मंगलौरमध्ये काँग्रेसच्याच निजामुद्दीन यांनी ४२२ मतांच्या निसटत्या फरकाने भाजप उमेदवाराचा पराभव केला. मध्य प्रदेशमध्ये भाजपला यश मिळाले. अमरवरा येथे भाजपच्या कमलेश प्रताप शहा यांनी तीन हजार मतांनी काँग्रेसच्या धरीन सह इनवती यांचा पराभव केला. माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे हे प्रभावक्षेत्र मानले जाते.

अल्टिमेटम संपला, मनोज जरांगेंचं पुढचं पाऊल काय?

मुंबई : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी सरकारला १३ जुलैपर्यंत अल्टिमेटम दिला होता. हा अल्टिमेटम संपला आहे. परंतु, अद्यापही सरकारने कोणतीही घोषणा केलेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे यांचा पुढचं पाऊल काय असणार याकडे सर्वांचं लक्ष आहे. आज त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जाहीर सभा घेऊन मराठा बांधवांशी संवाद साधला आणि सरकारला पुन्हा एकदा संधी द्यायची असं ते म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या जनजागृतीसाठी मनोज जरांगे पाटलांनी शांतता फेरी काढली होती. याची सांगता छत्रपती संभाजी नगरमधील क्रांती चौकात झाली. क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर जरांगे पाटलांनी लाखोंच्या जनसमुदायाशी संवाद साधला.

केंद्राकडून काश्मीरच्या उपराज्यपालांच्या अधिकारात वाढ

नवी दिल्ली : काश्मीरला मिळालेला विशेष दर्जा काढून घेतल्यानंतर केंद्र सरकारने उपराज्यपालांच्या अधिकारांमध्ये वाढ केली आहे. यापुढे शासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार उपराज्यपालांकडे असणार आहेत. नॅशनल कॉन्फरन्स ने मात्र केंद्राच्या या निर्णयाला विरोध व्यक्त केला असून राज्याला केवळ शिके उंटविणारा मुख्यमंत्री नको आहे,

नॅशनल कॉन्फरन्सचा विरोध

असे मत व्यक्त केले आहे.

काश्मीरमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका घेतल्या जाणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने जम्मू काश्मीर पुनर्स्थापना अधिनियम २०१९ मध्ये सुधारणा केली आहे. या सुधारणेनुसार शासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीचे प्रस्ताव राज्याचे मुख्य सचिव अथवा मुख्यमंत्री यांच्यामार्फत उपराज्यपालांना सादर करणे आवश्यक करण्यात आले आहे. त्यांच्या संमती नंतरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. या सुधारणामुळे अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार राज्य शासन ऐवजी उपराज्यपालांकडे गेले आहेत.

या सुधारणेमुळे राज्य सरकारला प्रत्येक बदली आणि नियुक्तीसाठी उपराज्यपालांकडे भीक मागावी लागणार आहे. त्यामुळे आपला या सुधारणेला विरोध आहे. राज्याला केवळ शिक्के उमटविणारा मुख्यमंत्री नको आहे. त्याला कार्यकारी अधिकार असणे गरजेचे आहे, असे मत नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केले आहे.

मराठवाड्यातील अनेक युवक इसिसच्या जाळ्यात

छत्रपती संभाजीनगर : इसिस या जागतिक दहशतवादी संघटनेचे जाळे मराठवाड्यात विशेषतः छत्रपती संभाजीनगरमध्ये खोलवर रुजले असल्याची माहिती उघड झाली आहे. छत्रपती संभाजी नगर मधील एका उच्चशिक्षित दहशतवादी युवकाला अटक करून त्याची सखोल चौकशी केल्यानंतर शहर आणि मराठवाड्यातील इतर ठिकाणी असलेले पन्नासहून अधिक युवक दहशतवादी संघटनेत सहभागी झाल्याचा प्रकार उघडकीला आला आहे.

संशयित हालचाली असल्यामुळे दीर्घ काळ नजर ठेवल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने फेब्रुवारी मध्ये छत्रपती संभाजी नगर येथील मोहम्मद शोएब या माहिती तंत्रज्ञान अभियंता असलेल्या युवकाला शी संबंध असल्याच्या कारणावरून अटक केली होती. शोएब हा बंगळुरू येथील माहिती तंत्रज्ञान कंपनीत काम करीत होता. सुमारे वर्षभर तू घरातूनच कंपनीचे काम करीत असे. याच काळात त्याने मराठवाडा आणि राज्याच्या इतर भागातील तरुणांना धार्मिक आवाहन करून इसिसच्या जाळ्यात ओढून आणले.

शोएब हा त्याने निवडलेल्या युवकांना व्हॉट्सप ग्रुपद्वारे धार्मिक कट्टरतेचे संदेश देऊन त्यांचे 'ब्रेन वॉशिंग' करीत असे. दहशतवादी विचारांच्या जाळ्यात पूर्णपणे अडकलेल्या युवकांना त्याने स्फोटकांचा वापर करण्याचे प्रशिक्षणही दिले होते. या युवकांच्या माध्यमातून राज्यातील विविध संवेदनशील ठिकाणी बॉम्बस्फोट घडविण्याचा त्याचा कट होता. हा कट पूर्णत्वाला गेल्यानंतर अफगाणिस्तान अथवा तुर्कस्तान येथे पलायन करण्याचा डावही त्याने आखला होता. त्याच्या अटकेनंतर दहशतवादी संघटनेचे मराठवाड्यातील जाळे उघड झाले आहे.

जयंत पाटील यांनी काँग्रेसवर फोडले पराभवाचे खापर

मुंबई: नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार जयंत पाटील पराभूत झाले. आपल्या अपयशाचे खापर त्यांनी काँग्रेसवर फोडले आहे. काँग्रेसने आपल्या मतांची समान वाटणी करण्याऐवजी शिवसेना उद्धव ठाकरे गटाला प्राधान्य दिल्याने आपला पराभव झाल्याचा ठपका पाटील यांनी ठेवला आहे. या निवडणूक निकालानंतरही आपण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्याबरोबर आहोत आणि यापुढेही त्यांच्याबरोबरच राहू, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आले. काँग्रेसचे दोन तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा एक उमेदवार निवडून आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने आपला उमेदवार न देता महाविकास आघाडीत घटक पक्ष असलेल्या शेकाफोला पाठिंबा दिला. मात्र या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस आणि शेकापोची मते कुठली. त्यामुळे जयंत पाटील यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

जयंत पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बारा मते आणि त्यांचे स्वतःचे एक अशी प्रथम प्राधान्यक्रमाची मते अपेक्षित होती. मात्र, शरद पवार गटाचे एक मत फुटले. तरीही दुसऱ्या प्राधान्यक्रमाची २५ ते ३० मते घेऊन आपण निवडून येऊ असा विश्वास पाटील यांना होता. मात्र, काँग्रेसने द्वितीय प्राधान्यक्रमाची मते आपल्याकडे न वळवता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांच्याकडे अतिरिक्त मते टाकल्यामुळे आपला पराभव झाला, असे जयंत पाटील यांनी नमूद केले आहे.

भाजप पक्ष पळवतो म्हणता आणि तुम्ही मित्रपक्षांशी असे का वागता : कपिल पाटील

मुंबई : भारतीय जनता पक्ष हा इतर पक्षांना पळवतो असा आरोप सातत्याने करता आणि आता महाविकास आघाडीतील छोट्या मित्रपक्षांशी असे का वागता, असा संतप्त सवाल माजी आमदार कपिल पाटील यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना केला आहे. शिवसेना ठाकरे गटामुळेच शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार जयंत पाटील यांचा पराभव झाल्याचा कपिल पाटील यांचा आरोप आहे.

सलग पाच वेळा विधानपरिषद सदस्य असणारे जयंत पाटील यांचा पराभव अतिशय वेदना देणार आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आधी मुंबई शिक्षक मतदार संघ तुमचा, असा शब्द आपल्याला दिला आणि ऐनवेळी दगाही दिला. स्वाभिमानी पक्षाचे राजू शेट्टी यांच्या विरोधात उमेदवार उभा करून त्यांचा पराभव घडवून आणला. महाविकास आघाडी म्हणून डाव्या आणि छोट्या पक्षांना जवळ घेता आणि ऐनवेळी असे का वागता, असा सवाल पाटील यांनी केला आहे. आम्हाला महाविकास आघाडी ठेवायचे की नाही, हे तुम्हीच ठरवा, असेही त्यांनी ठाकरे यांना सुनावले आहे.

लोकसभेचा निकाल डोक्यात जाऊ देऊ नका

लोकसभा निवडणुकीत सर्व छोट्या पक्षांनी महाविकास आघाडीच्या मनापासून मदत केली.

मात्र, मोठ्या पक्षाने त्याची जाण ठेवलेली नाही. नारायण नागोजी पाटील हे राज्याच्या पहिल्या विधानसभेचे सदस्य होते. त्यांचे शताब्दी वर्ष जवळ आले असतानाच त्यांच्या नातवाला म्हणजेच जयंत पाटील यांना सभागृहाच्या बाहेर काढता, अशा शब्दात पाटील यांनी ठाकरे यांच्यावर आगपाखड केली आहे. जयंत पाटील सहज निवडून आले असते. शिवसेना ठाकरे गटाने त्यांचा पराभव केला आहे, असा स्पष्ट आरोपही पाटील यांनी केला. लोकसभेचा निकाल डोक्यात जाऊ देऊ नका, असा इशाराही त्यांनी ठाकरे यांना दिला आहे.

शिरोळ तालुक्यातील विविध रस्त्यांसाठी १० कोटी रुपये मंजूर

'गुरुदत्त ' चे चेअरमन माधवराव घाटगे यांचा पाठपुरावा

कुरुंदवाड : शिरोळ तालुक्यातील उद्योगधंद्यासाठी व पर्यटण वाढीसाठी चांगल्या व दर्जदार रस्त्यांची आवश्यकता होती. तालुक्यातील विविध गावातील रस्त्यांसाठी श्री गुरूदत्त शुगर्स चे चेअरमन व कार्यकारी संचालक माधवराव घाटगे यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून रस्त्यांसाठी पुरवणी अर्थसंकल्पात १० कोटी रुपये मंजूर केले आहेत. शिरोळ तालुक्यातील राज्य मार्ग क्र. २०० पासून मजरेवाडी - श्री गुरुदत्त साखर कारखाना ते टाकळीवाडी - घोसरवाड काळम्मावाडी वसाहत घोसरवाड नदी पाणवठा ते कर्नाटक राज्य हद्दीपर्यंतचा प्रजिमा ९२ व घोसरवाड प्रमुख जिल्हा मार्ग ९२ पासून हेरवाड, मजरेवाडी ते दत्त कॉलेज कुरुंदवाड चा रस्ता प्रजिमा - १०४ या रस्त्याच्या रूंदीकरणासह सुधारणा करणेसाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्यांच्या निधीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि वस्त्रोउद्योग मंत्रि नामदार चंद्रकांतदादा पाटील यांचे विशेष सहकार्य मिळाले असल्याचे श्री. घाटगे यांनी सांगितले .

शिरोळ मधिल राज्य मार्ग क्र. २०० ते प्रजिमा क्र. ९२ आणि घोसरवाड पासून प्रजिमा- ९२ ते कुरुंदवाड प्रजिमा- १०४ हेरवाड, मजरेवाडी चिक्कु बाग (मजरेवाडी बायपास) ते दत्त कॉलेज कुरुंदवाड या रस्त्यांच्या रुंदीकरणासह सुधारणा करणे यासाठी - ३.५ कोटी रुपये , अकिवाट बागी रस्त्यावरील अकिवाट कॉर्नर ते अकिवाट टेक या रस्त्यासाठी २ कोटी रुपये, गुरुदत्त कारखाना शेजारील टाकळीवाडी रोडवरील बाळूमामा कमान ते टाकळीवाडी गावापर्यंतचा रस्ता रुंदीकरणासाठी २.५ कोटी रुपये , तसेच याच रस्त्यांवरील घोसरवाड पाझर तलाव ते काळम्मावाडी वसाहत (वन विभागाची हद) या रस्त्यासाठी २ कोटी असे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. वन विभागातील घोसरवाड मार्ग जाणाऱ्या या बायपास रस्त्यामुळे या भागातील नागरिकांना कोल्हापूरला जाणेसाठीचा अंतर कमी होऊन प्रवास सुलभ होणार आहे.

यावेळी बोलताना श्री. घाटगे म्हणाले , तालुक्यातील ऊस हंगाम सुरू झाल्यानंतर व इतर वेळी रस्त्यावरील होणारी वाहणांची वर्दळ , अवजड व इतर वाहनांची वाढलेली संख्या, रस्तांचा होणारा वापर व रस्त्यालगत असणाऱ्या गावाची लोकसंख्या लक्षात घेता मंजूर झालेल्या या निधीमुळे तालुक्यातील विविध रस्ते दर्जे दार होऊन प्रवास सुलभ व जलद होण्यास मदत होणार आहे.

रक्षाबंधनाला लाडक्या बहिणींच्या खात्यावर तीन हजारची भेट जमा करणार : पालकमंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर : मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत १५ ऑगस्टला माता- भगिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा करून माता- भगिनींना रक्षाबंधनाची भेट देणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यानी केले.

माद्याळ (ता. कागल) येथे बांधकाम कामगारांना भांडी वाटप व कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात पालकमंत्री श्री. मुश्रीफ बोलत होते. मेळाव्याचे अध्यक्ष माजी सरपंच मारुतीराव चोथे होते. कार्यक्रमात चिकोत्रा खोऱ्यातील ४०० बांधकाम कामगारांना नामदार श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते भांडी संच वितरण करण्यात आले.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, सरकारने सर्वसामान्य, गरीब व कष्टकरी जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना अमंलात आणल्या. मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण हि योजना महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी असून या योजनेचा लाभ सर्व माता-भगिनींनी घ्यावा. स्थानिक पातळीवर अंगणवाडी सेविकांनी यासाठी कार्यरत राहून महिलांना मदत करावी.

स्वागत व प्रास्ताविकपर भाषणात कागल तालुका सहकारी खरेदी -विक्री संघाचे संचालक सुर्याजी घोरपडे म्हणाले, कागल तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून हसन मुश्रीफ साहेबांच्याकडे जी - जी पदे आली त्या सर्व पदांचा वापर त्यांनी सर्वसामान्य माणसाला लाभ मिळवून देण्यासाठीच केला. पक्ष , गट -तट न पाहता मुश्रीफ यांनी आजपर्यंत सामान्य माणसाच्या जीवनात आनंदाचे क्षण आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. ज्या -ज्या योजना राबवल्या त्या सर्व योजना या राज्यातील सामान्यातल्या सामान्य माणसासाठीच आणल्या.

यावेळी मारुतीराव चोथे, जे.डी. मुसळे , सरपंच बंडू सुतार, अरुण खोत, संताजी चौगुले, महादेव रानमाळे, आनंदा चव्हाण, वसंतराव मेतके, हिराजीत पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य आदीसह ग्रामस्थ व बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोबाईल देण्याच्या नावाखाली १५ लोकांची लाखोंची फसवणूक

कोल्हापूर - बजाज फायनान्स आणि एचडीएफसी बँकेत लोन करून किमती मोबाईल हँडसेट देण्याच्या नावाखाली १५ लोकांची १५ लाख ३ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीला आला आहे . याप्रकरणी लक्ष्मीपुरी पोलिसांनी पाचगाव इथल्या रायगड कॉलनीत राहणाऱ्या अनिकेत प्रकाश चिपरे याला अटक केली असून न्यायालयानं त्याला १६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

कोल्हापुरातील लक्ष्मीपुरी आणि राजारामपुरी इथल्या हिरा पन्ना या मोबाईल शॉपीत कोल्हापुरातील नंदनवन पार्क इथला गणेश जाधव आणि करवीर तालुक्यातील पाचगाव इथल्या रायगड कॉलनीतील अनिकेत प्रकाश चिपरे हे दोघे फायनान्स आणि बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करून, लोनवर मोबाईल हँडसेंट देणारे मोबाईल कंपनीचे प्रतिनिधी म्हणून काम करत होते .

विद्युत मोटारी चोरणारी टोळी सातारा शहर पोलिसांच्या ताब्यात

सातारा : सातारा शहरालगतच्या खिंडवाडी परिसरातील शेतातून बोअरवेलमधील विद्युत मोटारी ट्रॅक्टरच्या सहाय्याने चोरुन नेणाऱ्या चौघांच्या मुसक्या शहर पोलिसांनी आवळल्या. संशयित हे खिंडवाडी गावातीलच आहेत. पोलिसांनी संबंधितांकडून सुमारे साडे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार याप्रकरणी सुरज साहेबराव जाधव (वय ३१), प्रसाद उर्फ बंटी अनिल चव्हाण (वय २५), सुरज अशोक चव्हाण (वय २८) आणि विशाल संपत क्षीरसागर (वय २८, सर्वजण रा. खिंडवाडी सातारा) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर सातारा शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खिंडवाडीमधील शेतकऱ्यांच्या बोअरमधील विद्युत मोटारी चोरीस जात होत्या. याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल होता. या चोरीच्या अनुषंगाने पोलिस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त पोलिस अधीक्षक आँचल दलाल, पोलिस उपअधीक्षक राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली शहर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र म्हस्के यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेस गुन्हे उघडकीस आणण्याची सूचना केली होती.

त्यानुसार या पथकाने माहितीच्या आधारे चौघांना खिंडवाडी परिसरातून ताब्यात घेतले. चौघांनीही जानाई मळाई परिसरातून ट्रॅक्टरच्या सहाय्याने बोअरवेलमधून विद्युत मोटारींची चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी या गुन्ह्यात चोरीसाठी वापरलेला ट्रॅक्टर, तीन मोबाईल, विद्युत मोटार असा एकूण ६ लाख ६५ हजारांचा ऐवज जप्त केला आहे.

गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक सुधीर मोरे, हवालदार सुजीत भोसले, नीलेश यादव, नीलेश जाधव, पंकज मोहिते, विक्रम माने, सचिन रिटे, इरफान मुलाणी, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सुशांत कदम, तुषार भोसले आदींनी कारवाईत घेतला.

छत्रपती शाहू मल्टीस्टेट हडपसर शाखेसमोर ठेवीदारांचा पैसे मिळत नसल्याने टाहो

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी ठोकले हडपसर शाखेला टाळे

हडपसर : छत्रपती शाहू महाराज मल्टीस्टेट सोसायटी मध्ये नागरीकांच्या कोट्यावधी रुपयांच्या ठेवी अडकल्या असून ज्येष्ठ नागरिकांना तारीख पे तारीख दिले जात असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस हडपसर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने हडपसर शाखेला टाळे ठोकून आंदोलन करण्यात आले.

छत्रपती शाहू महाराज मल्टीस्टेट सोसायटी मूळ बीड जिल्ह्यातील असून महाराष्ट्रात या सोसायटीच्या २३ शाखा आहेत, हडपसर परिसरातील ज्येष्ठ नागरिक व महिलांनी आयुष्याची पुंजी या सोसायटीमध्ये जास्त व्याज मिळेल या अपेक्षेने गुंतवल्या, अनेक दिवस सोसायटीमध्ये चकरा मारूनही तसेच ठेवींची मुदत संपली तरीही व्यवस्थापनाकडून पैसे मिळत नाही आणि तारीख पे तारीख मिळत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हडपसर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. व्यवस्थापनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

तसेच हडपसर पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.

या आंदोलन प्रसंगी हडपसर विधानसभा अध्यक्ष डॉ.शंतनू जगदाळे, युवक अध्यक्ष इंद्रसेन काकडे, गणेश ढाकणे, ऋषिकेश म्हस्के, शंकर झेंडे, योगेश थोरात, विनोद सकट, श्रेयस महानोर, सचिन मते,माणिक शेट्टी, मिलींद करंडे

राष्ट्रवादी वैद्यकीय सेल अध्यक्ष भारती रमेश तुपे, कार्याध्यक्ष रोहिणी शिरसागर, युवती अध्यक्ष सुजाता कटके, सरचिटणीस बिना कटीमनी, महेश्वरी मुदलियार, शितल गोंधळे, गौरी भोसले, गौरी इचके यांच्यासह ठेवीदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ठेवीदार व आंदोलकांनी हडपसरच्या गुन्हे पोलीस निरीक्षक मंगल मोढवे यांच्याकडे निवेदन देऊन गाऱ्हाणे मांडले या संदर्भात चौकशी करून गुन्हा दाखल करणार असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

यासंदर्भात सोसायटीचे चेअरमन संतोष भंडारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ न शकल्याने प्रतिक्रिया उपलब्ध झाली नाही. राज्यात अशा अनेक सोसायट्यांमध्ये ठेवे घेतल्या जातात कर्ज वाटप केले जाते वसुली होत नाही त्यानंतर ठेवेदारांना आयुष्याच्या पूंजीसाठी संघर्ष करावा लागतो आहे.

ठेवीदारांच्या , वृध्दांच्या पुंजीसाठी कडक कायदे करण्याची गरज असल्याचे डॉ. शंतनू जगदाळे यांनी सांगितले.

गगनबावड्यात आढळले दोन दुर्मीळ साप

कोल्हापूर : गगनबावडा भुईबावडा घाट परिसरात फिरत असताना गगनबावडा ग्रामीण रुग्णालयात बालरोगतज्ज्ञ म्हणून काम करणाऱ्या डॉ. अमित पाटील आणि त्यांचे सहकारी तेजस पाटील यांना पाण्यात एक साप दिसला. डॉ. पाटील यांना प्रथमतः तो पाणदिवड असेल असे वाटले पण नंतर जवळून निरीक्षण केल्यावर तो वेगळा साप असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या सापाचा शोध अगदी अलीकडेच लागला आहे. याशिवाय, डॉ. पाटील यांना करूळ घाट परिसरात 'कवड्या' सापांपैकी दुर्मीळ प्रजाती असणाऱ्या 'त्रावणकोर कवड्या सापा'चेही अस्तित्व आढळून आले आहे.

शस्त्र, नाणी, मूर्ती आदी वस्तूंमुळे ऐतिहासिक कालखंडाला मिळतो उजाळा

वाई : आजच्या तरुण पिढीला धगधगत्या मराठ्यांच्या इतिहासाचा विसर पडत चालला आहे. ऐतिहासिक कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सत्तेत अंगावर शहारे आणणाऱ्या लढाया झाल्या. त्या कालखंडात लढाई मध्ये वापरण्यात आलेल्या अस्सल शस्त्रास्त्रांचा इतिहास संग्रहाच्या माध्यमातून जिवंत ठेवला जात आहे.

वाई येथील रविवार पेठमध्ये राहणारे प्रसाद बनकर यांच्याकडे दीड़ हजारांहून अधिक शस्त्रांचा तर साडेबावीस हजार नाणी आणि दोनशे-तीनशे वर्षांपूर्वीच्या वस्तूंचा अनोखा संग्रह बघायला मिळतो.

आजोबांकडून मिळाली संग्रहाची प्रेरणा...

वाई येथील रविवार पेठ मध्ये राहणारे प्रसाद बनकर यांच्या आजीकडे एक पैसा, दोन पैशांची नाणी तर आजोबांकडे ब्रिटिश कालीन ढब्बू पैसा बघायला मिळाला. त्यावेळी प्रसाद अवघ्या सहावी-सातवीत शिक्षण घेत होता. त्यावेळी आजी-आजोबांकडील नाणी पाहून त्याला आवड निर्माण झाली. हळूहळू प्रसाद यांनी नाणी संग्रहीत करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी अभ्याससुध्दा करण्यास सुरुवात केली. लहानपणी लागलेली आवड मोठेपणी छंदात बदलत गेली आणि संग्रह करण्यास धडपड सुरू झाली.

ऐतिहासिक कालखंडातील नाणी आणि शस्त्रांचा संग्रह...

प्रसाद बनकर यांच्याकडे विविध राजघराण्यातील साडेबावीस हजार नाणी, मराठा धोप, दांडपट्टा, मुगल तलवार, मराठा समशेर, मुघल समशेर, तबर जातीच्या कुऱ्हाडी व कुऱ्हाडींचे प्रकार, कट्यारी, सर्पिनी तलवार, मराठा खांडा तलवार, वाघनखे व वाघनखांचे प्रकार, जांभिया, मुघल कर्द, मुघल खंजीर, खंजराली, विविध प्रकारचे भाले व भाल्यांचे प्रकार, विविध प्रकारचे चाकू, चंद्रकार तलवार, ब्रिटिश तलवार, निमछा तलवारी, मराठा चिमटा समशेर, चिलखत जिरेटोप, धनुष्य व बाणांचे प्रकार, पेशकबज, विविध प्रकारचे लोखंडी-पोलादी अडकित्ते, दगडी लोखंडी तोफगोळे, विविध प्रकारच्या गुप्ती, गुर्ज, पोलादी ढाल, गेंड्याच्या कातडी पासून बनवलेली ढाल व ढालीचे विविध प्रकार, बिचवे, चिलानम खंजीर या वस्तूंसह विविध धातूंच्या इसवी सन १४ व्या शतकापासून ते १९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंतच्या कालखंडातील मुर्त्यांनी त्यांचे घर भरले आहे. तसेच इसवी सन १६ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंतचे विविध काळातील दिवे व दिव्यांचे प्रकार देखील त्यांच्या संग्रहामध्ये आहेत.

या वस्तू जमा करण्याचा छंद जवळपास २४ वर्षे अविरतपणे ते करत आहेत. तसेच गेली १६ वर्षे ते संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून शिवकालीन शस्त्रास्त्रांची भव्य प्रदर्शने देखील करीत असतात. आजपर्यंत जवळपास १९४ पेक्षा जास्त शिवकालीन शस्त्रास्त्रांची प्रदर्शने प्रसाद यांनी महाराष्ट्रभर केलेली आहेत. अविरत व अखंडपणे शिवकार्य केल्याबद्दल त्यांना १४ पेक्षा जास्त राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात देखील आलेले आहे. आजच्या पिढीला आपल्या पूर्वजांनी जो दैदीप्यमान इतिहास घडविला याची माहिती व्हावी या उद्देशाने हा संग्रह केला आहे. यांच्या संग्रहातील सर्व शस्त्रास्त्रे ही पॅनलला लावण्यात आलेली आहेत.

जोगेश्वरी मंदिरातील दानपेटी फोडून ३५ ते ५० हजार रुपयांची रक्कम लांबवली

भोर : शिंगवे (ता.आंबेगाव)येथील ग्रामदैवत श्री.भैरवनाथ माता जोगेश्वरी मंदिरातील दानपेटी फोडून त्यामधिल अंदाजे ३५ ते ५० हजार रुपयांची रक्कम अज्ञात चोरट्यांनी लांबवली आहे .ही घटना शुक्रवारी (दि. १२) मध्यरात्री घडली.नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

शिंगवे गावातील ग्रामदैवत भैरवनाथ मंदिराच्या पूर्वेच्या बाजूकडील स्लाइडिंगच्या खिडकीच्या बाहेरील स्टीलचे ग्रील तोडून त्यानंतर खिडकीची काच काढून चोरट्यांनी आत प्रवेश केला. दानपेटीचे कुलूप तोडुन त्यामधिल रक्कम चोरट्यांनी लांबविली . दानपेटीत अंदाजे ३५ ते ५० हजार रुपये असल्याचे पुजारी रामचंद्र गुरव यांनी सांगितले. शनिवारी (दि. १३) रोजी सकाळी पाच वाजता रामचंद्र गुरव हे पूजेसाठी मंदिरात आले असता त्यांना मंदिराची पूर्वेकडील खिडकी उघडी दिसल्याने त्यांना शंका आली . त्यांनी दानपेटी पाहीली तर दानपेटीला कुलूपही दिसले नाही .त्यांनी तात्काळ पोलीस पाटील गणेश पंडित यांना ही माहीती दिली. गणेश पंडित यांनी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात भैरवनाथ मंदिरात चोरी झाल्याची खबर दिली . पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांनी तातडीने मंदिराला भेट देऊन पहाणी केली . मंदिरातील सीसीटिव्ही कॅमेरे बंद असल्याने त्यांनी गावातील ग्रामपंचायतीच्या विविध ठिकाणी बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून पाहिले.

मंदिरातील झालेल्या चोरीच्या तपासकामी श्वान पथक व ठसेतज्ञांना पाचारण करण्यात आले आहे . पुढील तपास पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे करत आहे .

मागील काही दिवसांपासून ड्रोन कॅमेरे या भागात रात्रीच्यावेळी घिरट्या घालत असल्याचे या भागातील नागरीक सांगत आहे . त्याचा आणि या चोरीच्या घटनेशी काही संबंध आहे का ? अशी शंका स्थानिक नागरीकांनी उपिस्थित केली आहे . तालुक्याच्या पुर्व भागात रांजणी , वळती , शिंगवे , जवळे , भराडी , थोरांदळे परिसरात रात्रीच्यावेळी ड्रोन फिरत असल्याने नागरीक भयभीत झाले आहे , तरी प्रशासनाने या ड्रोनच्या संबंधी तपास करून खरी काय माहिती आहे ते सांगावे अशी मागणी नागरीक करत आहे .

साखर कारखान्यांवर कारवाई करा

स्वाभिमानी संघटनेची मागणी; ऊसबिल वसुलीसाठी आंदोलनाचा इशारा

सातारा : गळीत हंगाम संपून जवळपास दोन महिने संपले तरीही अनेक साखर कारखाने यांनी कायद्याची पायमल्ली करून शेतकऱ्यांना उसाचे बिल दिले नाही. जिल्ह्यातील सर्वच ऊस बिल न देणारे व अंतिम हिशोब न करणारे कारखाने अथवा शासकीय कार्यालयात ऊस बिल वसुली कायदा पाळा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना निवेदन दिले असून, त्यात नमूद केले आहे की, सन २०२३-२४ ऊस गळीत हंगाम संपून जवळपास दोन महिने संपले तरीही अनेक साखर कारखाने यांनी कायद्याची पायमल्ली करून शेतकऱ्यांना उसाचे बिल दिले नाही. या हंगामात सातारा जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने यांनी शुगर केन कंट्रोल अँक्ट १९६६ चे ३ (अ) भंग वारंवार करुन सुध्दा त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही.

सातारा जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने शेतकरी अनेक संकटांचा सामना आजपर्यंत करत आहेत. शासनाने गेल्या वर्षी याची पाहणी करून सर्कलनिहाय दुष्काळ जाहीर केला होता. अशा अवघड परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असताना कायदा मोडून शेतकऱ्यांची लूट केली आहे व हंगामाच्या सुरवातीला जवळपास ४० दिवस कसलेही ऊस बिल दिले नाही व कायदेशीर १५ टक्के व्याजासह ते दिले गेले पाहिजे होते. तेही दिले नाही. हंगाम संपल्यानंतर कायद्याने १५ दिवसात साखर आयुक्त कार्यालय येथे सर्व हिशोब सादर करुन आर एस एस सूत्रांनुसार अंतिम बिल शेतकऱ्यांना द्यायचे आहे. हा नियम कोणत्याही साखर कारखान्यांनी पाळला नाही.

इथेनॉल निर्मिती करताना किती साखर उतारा कमी झाला व इथेनॉल मधून किती नफा मिळवला? उपपदार्थ यातून किती उत्पन्न झाले या सर्वांचा हिशोब हा गेली अनेक वर्षे संगनमताने जुळवाजुळवी करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे.

प्रशासन हेच यामध्ये सहभागी आहे त्यामुळे गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. मग हे सगळे कायदे फक्त लिहण्यासाठी व वाचण्यासाठी आहेत का, असा सवालही शेतकरी संघटनेने केला आहे. किसनवीर सहकारी साखर कारखाना भुईंज ता. वाई याचे संचालक मंडळ यांनी तर गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे व सन २०२०/२१ मधील ऊस बिल ५५ कोटी व कायदेशीर १५ % व्याज हे आजही शेतकऱ्यांना मिळाले नाही व त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची फक्त कागदे नाचवण्यात आली आर आर सी ची कारवाई चे आदेश दिले पण कारवाई आजपर्यंत करण्यात आली नाही आपल्या अश्या वृत्तीने कायदा मोडणाऱ्या कारखानदारांचे बळ वाढले व नंतरच्या दोन हंगामाचे ऊस बिल सुध्दा योग्य पध्दतीने दिले गेले नाही असे अनेक गंभीर प्रकार करून अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना लुटण्यात आले आहे.

निवेदन देतेवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके, राज्य सदस्य अर्जुनभाऊ सांळुखे, मनोहर येवले, रमेश पिसाळ, विजयसिंह पिसाळ, राजू घाडगे, मोहन घाडगे, सुधाकर शितोळे, महादेव डोंगरे, जनार्दन आवारे व शेतकरी उपस्थित होते.

जुन्या भांडणाच्या कारणातून एकावर तलवारीने वार

सातारा : जुन्या भांडणाच्या कारणातून एकावर तलवारीने वार करून जखमी केल्याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अक्षय पोपट धस रा. खावली, सातारा यांना दि. ९ रोजी खावली गावच्या हद्दीत असलेल्या कॅनॉल च्या कडेला बोलावून तेजस बर्गे पूर्ण नाव पत्ता माहीत नाही आणि दोन अनोळखी यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून अक्षय धस यांच्या कपाळावर तलवार मारून त्याला जखमी केले आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मोरे करीत आहेत.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

प्रॉपर्टी कार्ड वर करण्यात आलेल्या चुका विनाखर्च दुरुस्त करुन द्या : आमदार चेतन तुपे

हडपसर : शहरातील सातबाऱ्यांचे प्रॉपर्टी कार्डमध्ये रूपांतर झाले त्यावेळी नावात आणि अंकांमध्ये बऱ्याच चुका झाल्या आहेत. या चुका दुरुस्त करण्यासाठी सामान्य नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत आहे. याची दखल घेत हडपसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चेतन तुपे यांनी विधानभवनात विना खर्च या चुका दुरुस्त करून देण्याची मागणी केली आहे.

विधानभवनात बोलताना तुपे म्हणाले की, 'प्रॉपर्टी कार्डवरील टायपिंगच्या चुकांमुळे नागरिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे,तसेच व्यवहारात अडचणी येत आहेत. या चुका दुरुस्त करण्यासाठी त्यांना वारंवार सरकारी कार्यालयांना चकरा, फेऱ्या माराव्या लागतात. मुळात या चुका शासनाकडून झाल्या आहेत. पण त्याचा त्रास नागरिक भोगत आहेत.' असे म्हणत तुपे यांनी सभागृहाचे या बाबीकडे लक्ष वेधून घेतले. ते म्हणाले, सरकारची चूक असल्याने दुरुस्तीसाठी जे नागरिक अर्ज करतील त्यांना कोणताही वेगळा खर्च न घेता लवकरात लवकर या दुरुस्त्या करून द्यावे अशी मागणी केली.

लाडकी बहिण नोंदणीसाठी अंगणवाडीताई पदर खोचून शेतावर

पाटण तालुक्यात योजनेसाठी प्रशासन तत्पर

पाटण : पाटण तालुक्यात एकीकडे शेतीकामाची धांदल आणि दुसरीकडे 'लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज भरण्याची महिलांची गर्दी यामुळे सदर योजनेच्या नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करणे हे पाटण महसूल प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. अशातच पाटण तालुक्यात भात रोपा व नाचणी लावणीची कामे युद्धपातळीवर सुरु आहेत. शेतकऱ्याचं अवघं कुटुंब शेतीकामात गुंतल्याने अंगणवाडीताई आपल्या माय-भगिनींचा 'लाडकी बहिण' नोंदणीसाठी पदर खोचून पावसाच्या सारी झेलत अन् चिखल तुडवत थेट शेतशिवार पोहचल्याचे दिसत आहे.

पाटण प्रशासनाने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना तालुक्यात यशस्वी होण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न सुरू केले असून अंगणवाडी सेविका थेट शेतक-यांच्या शेतात जाऊन पात्र महिलांचे अर्ज भरून घेतानाचे चित्र सध्या तालुक्यात दिसत आहे,

मोडकवाडी (जिंती) येथील अंगणवाडी सेविका विजया लक्ष्मण मोडक या अंगणवाडीताईनी पदर खोचून पावसाच्या सरी अंगावर झेलत चिखल तुडवत थेट शेतशिवारात पोहचून महिला भगिनींची नोंदणी केली.

पाटण तालुक्यात सध्या भातलागणीस वेग आला असून महिला भगिनी भातलागणीच्या कामास व्यस्त आहेत. तर पुरूष मंडळी योजनेच्या लाभासाठी जन्माचे दाखले, शाळेचे दाखले,

मोडकवाडी (जिंती) येथे शिवारात जाऊन नोंदणी करताना अंगणवाडी सेविका विजया मोडक.

चाकरमान्यांनी धरली गावाची वाट

गावाकडे शिधापत्रिका आणि शिक्षण, नोकरी, व्यवसाय यासाठी दुर शहरांत असलेले लोकही 'लाडकी बहिण'च्या नोंदणीसाठी गावाची वाट धरून आहेत. तालुक्यात 'लाडकी बहिण' नोंदणी उत्साहात प्रगतीपथावर सुरू आहे.

रेशनकार्ड, आधार कार्ड, बँक खाते पुस्तक आदी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी तहसिलदार कार्यालय,शाळा, आधार सेंटर, बँकेत हेलपाटे घालत आहेत.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी प्रशानाच्या बैठका घेवून नोंदणीची गर्दी आणि महिला शेतकामात व्यस्त असल्याच्या अडचणीवर मात करण्यासाठी प्रशासनानेच लाभार्थींना थेट भेटून नोंदणीअर्ज भरण्याचे निर्देश दिले. यावर पाटणचे प्रांताधिकारी सुनील गाढे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अनंत गुरव, प्रकल्पाधिकारी राजश्री बने यांनी बारकाईने नियोजन केले. महिला लाभार्थ्यांना शोधून त्यांचा नोंदणी अर्ज भरण्याबरोबरच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्जाची माहीतीही अंगणवाडी सेविका, मदतनीस, तलाठी, कोतवाल, ग्रामसेवक यांचेकडून दिली जात आहे.

'राम पर्व' मधून नव्या रचनांची बरसात

भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

पुणे : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'राम पर्व' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. 'व्यक्ताव्यक्त' ,पुणे प्रस्तुत या कार्यक्रमात रामायणातील प्रसंगांवर नव्याने शब्दबद्ध आणि संगीतबद्ध केलेली गीते सादर करण्यात आली.या कार्यक्रमाला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम शनिवार,१३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.रसिकांना तो विनामूल्य खुला होता.

रामायणातले काही प्रसंग आणि ज्यांच्यावर काव्य लेखन झालेले नाही असे प्रसंग आणि पात्रं शोधून त्यावर काव्य लिहिण्याचा हा प्रयत्न 'पार्थ' (अमित गोखले) या कवीने या कार्यक्रमात केला.

'दशरथ राजा शरयू काठी', 'बागेमधूनी फिरताना सहज पाहिले रामाला', 'राम जानकी मिलन झाले', 'वचनास पाळूनी मी',' क्षमा करावी अबोध बाळा', 'काय म्हणावे नियती',' काय करावे त्रिजटा आई' , 'टंकार गरजला प्रत्यंचेचा किष्कींधा नगरीवर' , 'चित झाली मुंड्या चारी', 'शोका तुरा झाली अशी लंकेश्वरी मंदोदरी', 'झेप घेतली',' राम जय जय राम' , 'सावळी ती कांती' या रचनांना गीतरामायणाच्या पद्धतीनेच संगीतबद्ध करण्याचा प्रयत्न हेमंत आठवले आणि सौ. जान्हवी गोखले यांनी केला . शुभदा आठवले,केदार तळणीकर,अवधूत धायगुडे,वेधा पोळ यांनी साथसंगत केली.

भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१७ वा कार्यक्रम होता. भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी प्रास्ताविक करून कलाकारांचा प्रशस्तिपत्रक आणि ज्ञानेश्वरीची प्रत देऊन सत्कार केला.

सुरज शिलवंतच्या मारेकऱ्यास अटक करा : सचिन कांबळे

पाटण येथे रिपब्लिकन सेनेने केला निषेध व्यक्त, तहसिलदार यांना निवेदन

पाटण : गोंदवले,ता. वडूज येथील निष्पाप मयत सुरज सुनिल शिलवंत यांच्या मृत्युस कारणीभूत असणा-या आरोपीना तातडीने अटक करावी अशी मागणी पाटण तालुका रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष सचिन कांबळे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन, पाटण तहसीलदार अनंत गुरव, व पाटण पोलिस ठाण्यात देण्यात आले आहे,

निवेदनात म्हटले आहे की सुरज सुनिल शिलवंत याला खाजगी सावकारांनी मानसिक त्रास व दडपण आणल्यामुळे त्या खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून त्यांनी आपली जीवन

यात्रा संपवली आहे.त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे. या घटनेचा रिपब्लिकन सेना, पाटण तालुका यांनी निषेध केला आहे.याबद्दल पोलिस प्रशासनाकडे गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंद असून भा. द.वि.कलम ३०६, ३२३, ५०४, ५०६, ३४ तसेच अनुसुचित प्रतिबंधक कायदा १९८९ कलम ३(२) (त-), ६ अशा स्वरुपाचा गंभीर गुन्हा दाखल असून सुध्दा आरोपी मोकाट फिरत आहेत.

तरी या घटनेचा रिपब्लिकन सेना पाटण तालुका निषेध करीत असून पोलिसांनी तातडीने आरोपींना अटक करावी. अन्यथा, तीव्र आंदोलन केले जाणार आहे.

अँड. मार्कस देशमुख (माजी अध्यक्ष, पंडिता रमाबाई मुक्ती मिशन) यांचे स्पष्टीकरण

पुणे : 'पंडिता रमाबाई मुक्ती मिशन मध्ये धर्मांतर होत असल्याच्या मुद्दा विधानसभेत आणि प्रसारमाध्यमात आला असला तरी राजकिय हेतुने मुक्ती मिशनची बदनामी करण्याकरिता तसेच अल्पसंख्यांक संस्थांना विनाकारण बदनाम करण्याच्या हेतुने ही दिशाभुल करण्यात आलेली आहे.पंडिता रमाबाई मुक्ती मिशन मध्ये धर्मांतर होत नाही', असे स्पष्टीकरण पंडिता रमाबाई मुक्ती मिशनचे माजी अध्यक्ष मार्कस देशमुख यांनी दिले आहे. आज पुण्यात त्यांनी याबाबत पत्रक प्रसिद्धीस दिले आहे.

'मिशनवरील आरोप हा भाजप प्रणीत आमदाराचा विधान सभेची निवडणुक डोळयासमोर ठेवुन प्रसिध्दी मिळविण्याकरीता केलेला डाव आहे. यामध्ये अल्पसख्यांक संस्थाच्या जमिनी लाटण्याकरीता दबावतंत्राचा वापर करून संस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न हेतूपुरस्सर करण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान देखील मिशन विरुद्ध असा प्रचार करण्यात आला होता', असे देशमुख यांनी या पत्रकात म्हटले आहे.

'संबंधित दोन्ही मुलींना बाल कल्याण समितीच्या द्वारे प्रवेश देण्यात आला होता. खापरे यांनी पोलीस यंत्रणा व बाल कल्याण समितीवर केलेला आरोप हा बिनबुडाचा असुन खोटा व तकलादू आहे. संस्थेत दर महिन्याला बारामतीच्या सत्र न्यायालयाच्या महिला न्यायाधीश भेट देतात व पाहणी करतात. तसेच बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांची देखील संस्थेला भेट देत असतात.

पंडीता रमाबाई मुक्ती मिशनच्या संस्थापिका पंडिता रमाबाई यांनी १३५ वर्षापुर्वी संस्थेची स्थापना केली आणि तेव्हापासुन अनाथ विधवा ,स्त्रिया , मुलींचे निस्वार्थरीत्या सेवा केली जाते व आजही ही सेवा अवीरत चालु आहे. संस्थेला शासनाचे कसलेच मानधन किंवा अनुदान मिळत नाही. समाजातील लाखो मुलामुलीचे शिक्षण व संगोपन आजतागायत झाले आहे व सर्वांना स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची संधी आज मुक्ती मिशनमुळेच त्यांना मिळाली आहे', असे देशमुख यांनी म्हटले आहे.

'माझा स्वतःचा जन्म मुक्ती मिशन मध्येच झाला व याच संस्थेचा सात वर्षे अध्यक्ष होण्याचा मान देखील मिळाला. माझ्या अध्यक्ष पदाच्या काळात देखिल साधारणता २०१४ ते २०१६च्या दरम्यान रस्ता रुंदीकरणाच्या कारणावरून पंडिता रमाबाई मुक्ती मिशनचे अस्तीत्व नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पंडिता रमाबाईची खोली देखिल पाडण्याचा व संस्थेचे प्रार्थना मंदिर उध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला. माझ्यासारखे अनेक ख्रीस्ती समाजाचे लोक असे प्रकार खपवुन घेणार नाही. कारण पंडिता रमाबाई मुक्ती मिशन हे संपुर्ण देशाचे भुषण आहे व धार्मिक स्थळ आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीयांना अधिकार दिला आहे. त्यानुसार येथील काम चालते.पंडिता रमाबाई मुक्ती मिशनचा कारभार पारदर्शक पध्दतीने घटनेने दिलेल्या अधिकाराने चालविला जातो.आमदार उमा खापरे यांचा संपुर्ण खिस्ती समाजाच्या वतीने आम्ही निषेध करतो',असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

जिल्ह्यात २९ जुलैपर्यंत बंदी आदेश लागू

कोल्हापूर : जिल्ह्यात किल्ले विशाळगड येथील अनाधिकृत अतिक्रमणविरोधात हिंदूत्ववादी संघटनाकडून आंदोलन करण्यात येत आहे. तसेच विविध पक्ष, संघटनांकडून विविध मागण्यांसाठी आंदोलन, उपोषण, मोर्चा, इत्यादी प्रकारचे आंदोलन करण्यात येते. मोहरम सण व आषाढीवारी, नंदवाळ यात्रा, सण इत्यादी साजरे होणार आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात दिनांक १५ जुलै रोजी सकाळी ६ ते दिनांक २९ जुलै रोजी रात्री २४ वाजेपर्यंत बंदी आदेश जारी करण्यात येत असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी संजय तेली यांनी कळविले आहे.

हा आदेश ज्या सरकारी अधिकारी/कर्मचारी यांना त्यांची कर्तव्य, अधिकार बजाविणे संदर्भात कामकाज करताना उपर्निर्दिष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधीक्षक, कोल्हापूर अगर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी अगर संबंधित विभागाचे पोलीस निरीक्षक किंवा सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे, अशा व्यक्तींना तसेच सर्व जातीधर्माचे सण, उत्सव, जयंती, यात्रा हे शांततामय मार्गाने साजरे करण्याकरीता जमा होणारा जनसमुदाय यांना व लग्न, इतर धार्मिक समारंभ, सण, यात्रा, प्रेतयात्रा इत्यादी यांना लागू असणार नाही.

मराठी माणसाच्या उद्योग व्यवसायासाठी मराठी चेंबर ऑफ कॉमर्सची कार्यशाळा

मुंबई : चायना देश पिन ते पियानो सारख्या वस्तू बनवतो. मात्र त्याचे मार्केटिंग करण्यात कुठेच कमी पडत नाही. म्हणून त्यांच्या वस्तू माफक दरात व सहज उपलब्ध होतात. आपण मराठी माणूस मार्केटिंग करताना लपून छपून करतो त्यामुळे आपले व्यवसाय मागे पडतात. मराठी माणसाचे उद्योग व्यवसाय कसे जगभर पोहचतील यासाठी मराठी चेंबर ऑफ कॉमर्स या ४४ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या संस्थेने एका कार्यशाळेचे आयोजन केले आहे. याबाबतची माहिती मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेचे कार्याध्यक्ष मनोहर पेडणेकर यांनी शुक्रवारी दिली.

गेल्या ४४ वर्षापासून मराठी मातृभाषा असणाऱ्या माणसाला उद्योग व्यवसाय करण्यासाठी चेंबर सहकार्य करत आहे. संस्थेतर्फे १८ जुलै रोजी १३ महिन्याचा अभ्यासक्रम फक्त ३५०० रुपयात शिकवला जाणार आहे. प्रत्येक महिन्याच्या एका दिवशी प्रत्येकी तीन तासांचे एक सत्र आयोजित केले जाणार आहे. स्वातंत्रवीर सावरकर स्मारक सभागृह शिवाजी पार्क दादर मुंबई येथे एकूण ३९ तासांचे मार्गदर्शन होईल.पहिल्या तुकडीत फक्त १०० जणांना प्रवेश मिळतील असे मनोहर पेडणेकर यांनी सांगितले.

यावेळी बोलताना मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले, मराठी माणसाने साता समुद्रापार उद्योग व्यवसायाचा झेंडा रोवला आहे. मराठी चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेने नाममात्र दरात मराठी माणसाला उद्योग व्यवसाय करण्याची खूप चांगली संधी दिली आहे. प्रत्येक वेळी भांडवल नाही असे म्हणून मराठी माणूस नाराज होतो. मात्र आहे त्या भांडवलात किंव्हा भांडवल नसतानाही व्यवसाय कसा करायचा यासाठी या कार्यशाळेचा मराठी माणसाला लाभ होणार आहे.

यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, विवेक गद्रे, स्वप्नील राणे, निलेश कारंजे, राजन चौलकर, महेश बापट,मेहुल माने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मोरे यांच्याबरोबर मनसेचा एकही विद्यमान पदाधिकारी नाही : साईनाथ बाबर यांचा दावा

पुणे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून वंचित बहुजन आघाडमार्गे शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश केलेले वसंत मोरे यांच्या जाण्याने मनसेला काहीही फरक पडणार नाही. त्यांच्याबरोबर पक्षाच्या एकही विद्यमान पदाधिकाऱ्याने शिवसेनेत प्रवेश केलेला नाही. दोन दोन वर्ष पक्षाशी संबंध नसलेल्या लोकांची यादी दाखवून शिवसेनेत कुठले तरी पद पदरात पाडून घेण्याचा मोरे यांचा प्रयत्न आहे, असा आरोप मनसे शहरप्रमुख साईनाथ बाबर यांनी केला.

वसंत मोरे यांनी मनसेकडून लोकसभा निवडणुकीचे तिकीट मिळणार नसल्याचे स्पष्ट झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे

प्रमुख शरद पवार, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याकडे डाळ शिजेल का याची चाचपणी केली. तिथून नकारघंटा ऐकू येताच वंचितच्या झेंड्याखाली लोकसभा निवडणूक लढवली. त्यात त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. त्यानंतर त्यांनी वंचितच्या कार्यकर्त्यांनी आपल्यासाठी काम न केल्याचा आरोप करीत वंचितला सोडचिठ्ठी दिली.

मोरे यांनी तब्बल शंभर गाड्यांचा ताफा घेऊन ९ जुलैला मातोश्री गाठली आणि कार्यकर्त्यांना बळ देण्याच्या नावाखाली ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन हाती धारण केले.

... तर अनामत रक्कम तरी वाचली असती

यावेळी आपल्याबरोबर मनसेचे २ शहरप्रमुख, शाखाप्रमुख, उप विभागप्रमुख, वेगवेगळ्या सेलचे प्रमुख अशा २३ मनसे पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याचा दावा मोरे यांनी केला. मात्र, यापैकी काही जणांनी मोरे यांच्याबरोबर तर काहींनी त्याच्याही आधी पक्ष सोडला असून त्यांच्या जागेवर नवीन पदाधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, असा बाबर यांचा दावा आहे. गाड्यांचा भलामोठा ताफा आणि जुन्या पुराण्या नावांच्या याद्या घेऊन गेल्यामुळे वस्तुस्थिती बदलत नाही. नेते आणि कार्यकर्त्यांची एवढी मोठी ताकद मोरे यांच्या पाठीशी असती तर लोकसभा निवडणुकीत चित्र वेगळे दिसले असते. किमान मोरे यांची अनामत रक्कम तरी वाचली असती, अशा शब्दात बाबर यांनी मोरे यांची खिल्ली उडवली आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे आंदोलन

कोल्हापूर - सांस्कृतीक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार हे छत्रपती शिवाजी महाराजांची खोटी वाघनखे आणून शिवभक्तांची फसून करत आहेत. यासाठी आज कोल्हापुरातील ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाला होता. सांस्कृतीक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निषेधार्थ ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी बिंदू चौकात जोरदार निदर्शने केली.

इंद्रजित सावंत यांनी सरकारला व सांस्कृतिक खात्याला दिलेल्या माहितीमध्ये, १९४३ पर्यंतचे ठोस लिखित पुरावे सादर केलेत, यात शिवजी महाराजांचे वाघनख साताऱ्या मध्येच असल्याचे उपलब्ध छायाचीत्रासह सिद्ध केले आहे. दरम्यान म्यूझीअम कडे असणारे वाघनख शिवजी महाराजांची आहेत याचे कोणतेच पुरावे नाहीत हे म्यूझीअमने मान्य केले आहे. असे असतानाही भाजप सरकारने खोटी वाघनखे आणण्याचा प्रयत्न केल्यास भाजप सरकारचा डाव उधळून लावू, असा इशाराही यावेळी दिला.

संस्कृत संभाषण शिबिराला साताऱ्यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

संस्कृतभारती सातारा जनपद व आचार्य सिद्धी पवार यांचा संयुक्त उपक्रम

सातारा : संस्कृत भारती सातारा जनपद व भाजपच्या पक्षप्रतोद व माजी सभापती आचार्य सिद्धी पवार यांच्या संयुक्त विद्यमाने साताऱ्यात गेले ११ दिवस आयोजित संस्कृत संभाषण शिबिराचा समारोप झाला .संस्कृत भाषेची आवड निर्माण करणे आणि संस्कृत भाषा आत्मसात करणे या हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. साताऱ्यातील १०० हून अधिक महिलांनी या शिबिरामध्ये भाग घेतला होता.

संस्कृत भारतीच्या कोल्हापूर विभाग प्रमुख सौ स्वाती देशपांडे सातारा जिल्हा प्रचार प्रमुख सौ ममता जोशी यांच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिराला भाजपच्या नगरसेविका सिद्धीताई पवार यांचे सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये संस्कृत शिक्षिका ममता जोशी व सहशिक्षिका आभा घाडगे यांनी संस्कृत अध्यापन केले.

या शिबिराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखनाची पठणाची तसेच संस्कृतच्या पूर्व अभ्यासाची आवश्यकता नाही अगदी पहिल्या वाक्यापासून शिक्षक आणि विद्यार्थी संस्कृत व्यतिरिक्त इतर कुठल्याही भाषेत बोलत नाही. शिबिरामध्ये एका विशिष्ट पद्धतीने व्यवहार उपयोगी सरल संस्कृत बोलण्याचे अध्यापन या शिबिरामध्ये करण्यात आले.

व्यवहार उपयोगी छोटी छोटी वाक्य संस्कृतमध्ये बोलून मग अखंड संस्कृत संवाद कसा करावयाचा याचे प्रशिक्षण देण्यात आले. संस्कृत भारतीच्या हा उपक्रम गेले ४० वर्ष सुरू असून आत्तापर्यंत २० लाख लोकांनी या उपस्थिती दर्शवली आहे २० ते २५ देशांमधील संस्कृत संवर्धनाचे हे काम सुरू आहे.

वेद अभ्यासक वैद्यराज मोहन तांबे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले तर शिबिराच्या समारोप प्रसंगी आयुर्विमा महामंडळाचे निवृत्त अधिकारी संजय दीक्षित हे उपस्थित होते संस्कृत भारतीचे सातारा जनपद सहसंयोजिका रूपाली शुक्ला यांनी संस्कृत भाषा का शिकावी आणि तिचे महत्त्व आपल्या सरळ सोप्या विवेचनांमधून स्पष्ट केले

समारोपप्रसंगी संस्कृत भारतीच्या ध्येय मंत्राचे गायन यशोवर्धन जोशी यांनी केले. सिद्धीताई पवार, अपर्णा कुलकर्णी, वर्षा लंके, सुवर्ण फडणीस, सुनिता साखरे, सुशील वाकणकर सानिका देशपांडे, शशिकांत माने, संतोष कणसे, सुनील दिवेकर, यांनी संवाद कथा, विनोदी कणिका, स्वपरिचय, प्रहेलिका याचे संस्कृतमधून सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका देशपांडे यांनी केले

या कार्यक्रमासाठी साताऱ्यातून दीपलक्ष्मी नाईक, डॉक्टर माधवी जोग, श्री उदय कुलकर्णी, वरून रानडे सविता रानडे, अनुराधा सोनवणे ,अपर्णा सदावर्ते मानसी घाडगे, केतकी भिडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते सगळ्यांना संस्कृतची गोडी लागावी या उदात्त हेतूने संस्कृत भारतीचे वदतु संस्कृतम् हे पुस्तक सिद्धी ताई पवार यांनी उपस्थितांना भेट स्वरूपात दिले.

कराड उत्तरमध्ये आरोग्याचा महाजागर

आमदार बाळासाहेब पाटील वाढदिवस समितीच्यावतीने आयोजन : १० ते २७ जुलै अखेर विभागवार आरोग्य तपासणी शिबिरे

मसूर : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आरोग्य सुविधा महागडी होत आहे. सर्वसामान्य रुग्णांना आपल्या आरोग्य समस्यांवर उपचार करून घेणे परवडत नाही. अनेक रुग्ण आजारपण आपल्या अंगावर काढतात. यासाठी सर्वसामान्य रुग्णांची तपासणी करणे गरजेचे आहे. आजारपणाचे निदान होऊन डॉक्टरांना उपचार करणे शक्य होते.यासाठी सामान्य जनतेच्या सोयीसाठी सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बाधिलकी जोपासण्याचे काम माजी सहकार मंत्री आमदार बाळासाहेब पाटील वाढदिवस समितीने केले आहे. माजी सहकार मंत्री व कराड उत्तरचे लोकप्रिय आमदार बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस २९ जुलैला विविध उपक्रमांनी होत आहे. त्यानिमित्त वाढदिवस समितीने कराड उत्तर मतदारसंघातील सुमारे पंधरा प्रमुख ठिकाणी विभागवार आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करून सर्वसामान्य जनतेसाठी आरोग्याचा महाजागर राबवला आहे.

१० जुलैला पुसेसावळी, ११ रहिमतपूर, १२ तळबीड, १३ हेळगावला शिबिर झाले. १५ उंब्रज, १६ नागठाणे, १८ पाल, २० वाठार किरोली, २१ इंदोली, २२ म्हासुर्णे, २३ देशमुखनगर, २४ मसूर, २५ कोपर्डे हवेली, २६ अतीत, २७ ओगलेवाडी या ठिकाणी सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेने घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये हृदयरोग, इलेक्ट्रो कार्डिओग्राम (एउत्र),उच्च रक्तदाब, मधुमेह, रक्तातील साखर तपासणी, साखरवाढीमुळे होणारे आजार, नेत्रतपासणी, मोफत चष्मा वाटप व पुणे येथील नामांकित रुग्णालयात मोफत मोतीबिंदू ऑपरेशन, कॅन्सर संदर्भात तपासणी व मार्गदर्शन, तसेच स्त्री रोगावरील मार्गदर्शन व प्रथमोपचार, महात्मा ज्योतिबा फुले योजनेअंतर्गत मोफत ऑपरेशन सुविधा संदर्भात माहिती देण्यासाठी तज्ञ डॉक्टर व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

जशराज पाटील यांचे नेटके नियोजन.....

सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक व कराड उत्तरचे युवा नेते जशराज पाटील यांनी आमदार बाळासाहेब पाटील वाढदिवस समितीने आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात विशेष लक्ष घातले आहे. शिबिरापूर्वी नेटके नियोजन करीत कार्यकर्त्यांना शिबिराबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे या आरोग्य तपासणी शिबिराचा रुग्णांना लाभ होणार आहे.

जावळी तालुक्यातील सहा जणांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती

मेढा : सातारा जिल्हा परिषदेच्या कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी अखेर शिक्षणविस्ताराधिकारी पदोन्नतीचा विषय मार्गी लावत, गुरुवारी जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विस्ताराधिकारीपदी शिक्षकांना पदोन्नती दिली. त्यामुळे शिक्षक संघटनांच्या लढ्याला यश आले आहे.यामध्ये जावळी तालुक्यातील पाच जणांचा समावेश असून, पाच विस्ताराधिकाऱ्यांचा आज पंचायत समिती मेढा येथे गटविकास अधिकारी मनोज भोसले, गटशिक्षणाधिकारी संजय धुमाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अरविंद दळवी यांना कुडाळ शिक्षण विभाग बीट देण्यात आली तर डी. टी. धनवडे, बामनोली बीट, सुरेश मोरे -खर्शीबारामुरे,एन. के.धनावडे- महाबळेश्वर तालुक्यातील तळदेव शिक्षण विभागबीट, संजीवनी मिलन मुळे जिल्हा परिषद मुख्यालय, रघुनाथ दळवी यांना सातारा तालुक्यातील नागठाणे शिक्षण बीटपदी पदोन्नती देण्यात आली आहे.

पदोन्नती झालेल्या पाच शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन गटविकास अधिकारी मनोज भोसले, गटशिक्षणाधिकारी संजय धुमाळ यांनी केले. यावेळी शिक्षक संघाचे जिल्हा नेते मिलन मुळे, अशोक लकडे ,सुरेश काका जेधे, नंदकुमार मोरे, शंकर जांभळे,आदी उपस्थित होते.

गरजुना मदत करून केला आईचा वाढदिवस

कोरेगाव : आईचे आपणावर अनंत उपकार आहेत तिचे उपकार विसरू नका असे मत कोरेगाव नगर पंचायतिच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी व्यक्त केले.

गणेश चतुर्थी ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष गणेश भोसले यांच्या आई रुक्मिणी राजेंद्र भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त येथील लक्ष्मीनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप। करून साजरा करण्यात आला त्यावेळी विजया घाडगे बोलत होत्या. यावेळी कोरेगाव नगर पंचायतिचे प्रथम नगराध्यक्ष राजाभाऊ बर्गे, नगरसेविका संगिता ओसवाल, नगरसेविका स्नेहल आवटे चतुर्थी ग्रुपचे अध्यक्ष गणेश भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

विजया घाडगे पुढे म्हणाल्या, अनेक अडचणींना सामोरे जाऊन आपली आई आपणास जन्म देते. जन्मानंतर आपण मोठे होईपर्यंत आपला संभाळ करत असते आपल्या घासातला घास आपणास ती देते आपणावर आईचे अनंत उपकार आहेत. अगदी छ. शिवाजी महाराजांचा इतिहास वाचल्यानंतर आपणास माता जिजाऊंचे छ. शिवाजी महाराजांच्या जीवनातील

महत्व समजते.

चतुर्थी ग्रुपचे अध्यक्ष गणेश भोसले हे विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजाला पुढे नेण्यासाठी नेहमीच प्रयत्न करत असतात आज या ठिकाणी आईच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. मलाही यातून प्रेरणा मिळाली आहे.

राजाभाऊ बर्गे म्हणाले, गणेश भोसले याना आपण गेल्या अनेक वर्षांपासून पाहत आहोत समाजबद्दल तळमळ असलेला हा कार्यकर्ता आहे. आपल्या जन्मदात्या आईच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गणेश भोसले यांनी राबविलेल्या या उपक्रमाला मी शुभेच्छा देतो.

यावेळी विजया घाडगे, राजाभाऊ बर्गे यांच्या हस्ते शाळेत गरजु लहान मुलांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

पत्रकार सोमनाथ शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक शामराव बोतालजी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

राष्ट्रवादीच्या जनसन्मानं मेळाव्यासाठी साताऱ्यातून पाच हजार कार्यकर्ते जाणार

सातारा : उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली बारामती येथे रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसचा जनसन्मानं मेळावा होत आहे .या मेळाव्यासाठी सातारा जिल्ह्यातून तब्बल ५००० कार्यकर्ते बारामतीला रवाना होणार असल्याची माहिती पक्षाचे कार्याध्यक्ष अमित कदम यांनी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या नंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराच्या तयारीचे रणशिंग फुंकण्याची तयारी बारामती मधून चालवली आहे. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रावर अजितदादा पवार यांचे बारकाईने लक्ष असून या पट्ट्यामध्ये राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचा वर्चस्व राहण्यासाठी घरटी प्रचार आणि विकास कामांचे प्रबोधन यावर भर राहणार आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा बारामती मधून झालेला विजय हा अजित दादांसाठी जोरदार राजकीय धक्का होता. त्यामुळे या सर्व राजकीय कटू आठवणी मागे ठेवून आगामी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने अजितदादांनी जोरदार तयारी सुरू केली आहे लोकसभा निवडणुकांनंतर दादा कार्यव्यस्ततेमुळे बारामतीत पोहोचू शकले नाहीत मात्र रविवारी होणाऱ्या जनसन्मानं मेळाव्यासाठी अजितदादा यांनी जोरदार तयारी केली आहे. सातारा जिल्ह्यातून म्हणजेच जिल्ह्याच्या ११ तालुक्यातून तब्बल ५००० कार्यकर्ते या मेळाव्यासाठी रवाना होणार आहेत. या तयारीचा आढावा नुकताच पक्षाचे कार्याध्यक्ष अमित कदम यांनी घेतला आहे सातारा जिल्ह्यातही राष्ट्रवादीची ताकद वाढवण्याच्या दृष्टीने अजित दादांनी कार्यकर्त्यांना मतदारांपर्यंत वैयक्तिकरित्या पोहोचण्याचे निर्देश दिले आहेत. विधानसभा निवडणुकीत अजित दादा पवार राष्ट्रवादी गट चांगली कामगिरी करेल अशी अपेक्षा दादांना आहे.

सातारा जिल्ह्यात अजितदादा गटाचे वाई विधानसभा मतदारसंघाचे आमदार मकरंद पाटील हे एकच आमदार आहेत या जिल्ह्यात तरुण कार्यकर्त्यांची तगडी फौज उभी करण्यासाठी दादा बारामतीच्या मेळाव्यातून काय संदेश देणार याची उत्सुकता कार्यकर्त्यांना आहे? जनसन्मानं मेळाव्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे इत्यादी नेते उपस्थित राहणार आहे त्याद्वारे विधानसभा निवडणुकांच्या पूर्वतयारीचे रणशिंग फुंकले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

जवळवाडीच्या ऋग्वेदा लोखंडेचे सी ए परीक्षेत यश

मेढा : सातारा जावलीचे लोकप्रिय आमदार शिवेंद्राजे भोसले यांची प्रामाणिक कायेकर्ती श्रीमती गीता लक्ष्मण लोखंडे यांची एकुलती एक कन्या ऋवेतालक्ष्मण लोखंडे सध्याची सो. ऋग्वेता क्षितिज पंडीत ही उ- परीक्षा उत्तम मार्कानी उत्तीर्ण झाली. त्याबद्दल खासदार श्री. छ. उदयनराजे भोसले, आ. शिवेंद्राजे भोसले, रामराजे नाईक निंबाळकर व सर्वच स्तरातील मान्यवरांनी व जवळवाडी मेढा येथील समस्त नागरिकांनी तिचे अभिनंदन केले.

तिचे पहिली ते चौथी शिक्षण जवळवाडी मेढा येथे झाले असून इयत्ता चौथीमध्ये शिष्यवृती परिक्षेत जिल्हयात

ती चौथी आली होती. त्यानंतर तिचे सातारा येथे कल्याणी हायस्कुलमध्ये पाचवीसाठी अंडमिशन झाले. पाचबीत असताना तिने जवाहर नवोदय विद्यालय परिक्षेत जिल्हयात इतर मागास वर्गीयांमध्ये प्रथम आली.त्यानंतर सहावी ते बारावी शिक्षण सातारा येथे नवोदय विद्यालयात झाले. त्यादरम्यान १० वी पुर्ण इझाली त्यावर्षी तिचे वडील लक्ष्मण कृष्णा लोखंडे हे स्वर्गवासी झाले. त्यानंतर संपुर्ण शिक्षणाचा खर्च तिची आई श्रीमती गीता लोखंडे यांनी येणाऱ्या अनेक अडचणी पार करत केला. त्यानंतर पुढील शिक्षण पुणे येथे पूर्ण केले.

कॉलेजमध्ये तिने बी. कॉम केले व त्यावेळी तीने उ.- ची परिक्षा देण्यास सुरुवात केली. ती२०२४ साली भारतातील सर्वात अवघड असणारी व्यावसायीक परिक्षा चार्टड अकोटेंट (सनदी लेखापाल) उत्तीर्ण झाली. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक देखील होत आहे.

सातारा जिल्हा अन्यायग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करा

रिपाईचे जिल्हाधिकारी कार्यालयावर थाळीनाद आंदोलन

सातारा : सातारा जिल्ह्यामध्ये सातत्याने मागासवर्गीय, दलित, वंचित शोषित पीडितांवरती अन्याय अत्याचाराचे प्रमाण सुरू आहे जातीवादी लोकांकडून या नात्याकारणाने सातत्याने मागास वर्गीयांवरती अन्याय होत आहेत त्यामुळे त्यांना बंदुकीच्या परवानगी द्या अन्यथा सातारा जिल्हा मागासवर्गीय ग्रस्त जिल्हा घोषित करा या मागणीसाठी रिपाईच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले.

गोंदवले बुद्रुक तालुका माण सुरज शीलवंत या २८ वर्षीय तरुणाने खाजगी सावकाराच्या जाचास व मारहाणस कंटाळून आत्महत्या केली संबंधित सुरज शीलवंत याने आत्महत्या केली संबंधित सावकारांनी व्याजाच्या पोटी लहान मुलींच्या पायातील पैंजण काढून नेले त्यामुळे अशा व्यक्तीच्या लोकांना कठोर शासन होणे गरजेचे आहे त्यामुळे सुरज शीलवंत आत्महत्याच प्रवृत्त करणाऱ्या खाजगी सावकारी मोका अंतर्गत कारवाई करावी .खाजगी सावकारांच्या पाठीमागे असणाऱ्या सूत्रधरांचा शोध घ्यावा

पीडित कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्यात यावे

त्रिपुटी तालुका कोरेगाव येथील मागासवर्गीय दोन अल्पवयीन मुलीना फुस लावून व पैस्याचे खाण्यापिण्याच् आमिष दाखवून पालकांविरुद्ध भडकवणाऱ्या लोकांवरती कारवाई करा व आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलिसांची चौकशी करावी. पुसेगाव येथील मागासवर्गीय महिलेला सातत्याने मेसेज करून विनयभंग करणाऱ्या पवन राठोड या वायरमेन निलंबित करा या विविध मागण्यांसाठी थाळीनाद करण्यात आला. रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ राज्य संघटक कैलास जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आला. यावेळी दामिनी निंबाळकर वनिता कवळे वंदना सगरे स्नीता जगताप राजू ओव्हाळ योगेश माने, अतुल गरज खटाव तालुका अध्यक्ष सागर भिलारे माण तालुका अध्यक्ष सनि खरात निंबाळकर जिल्हा उपाध्यक्ष तालुका अध्यक्ष मनिषा सोनवणे कोरेगाव खटाव माण येथील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

वीर शिवाकाशीद समाधी स्थळ व परिसर

नुतनीकरणाचा आराखडा तयार करा : खासदार धैर्यशील माने

पन्हाळा : वीर शिवा काशीद समाधी स्थळ व परिसराच्या नुतनीकरणाचा आराखडा तयार करा तत्काळ प्रशासकीय मान्यता देण्यात येईल जिल्हाअधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन लागणारा निधी देतो असे आश्वासन खा. धैर्यशील माने यांनी दिले. लवकरच पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेले वीर शिवा काशीद समाधी स्थळ महाराष्ट्रातील अव्वल दर्जाचे स्मारक बनवू असे त्यांनी समाधीस अभिषेक कार्यक्रमात उपस्थित रहात असताना सांगितले.

महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हा कोल्हापूर व नाभिक समाज बांधवांच्या वतीने वीर शिवा काशीद यांची ३६४ वी पुण्यतिथी पन्हाळा येथे विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.सुरवातीला शिवा काशीद समाधीस खासदार श्रीमंत शाहूमहाराज छत्रपतींच्या हस्ते पवित्र जलाने अभिषेक करण्यात आला.यावेळी खासदार धैर्यशील माने,समरजितसिह घाटगे,माजी आमदार चंद्रदीप नरके, निर्मल ग्रामप्रणेते भारत पाटील उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पन्हाळगडावरील शिवा काशीद व बाजीप्रभू देशापांडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.त्यानंतर पन्हाळा नगरपरिषदेच्या सांस्कृतिक हॉलमध्ये मेळावा आयोजित केला होता. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व पुरस्कार प्राप्त समाज बंधू भगिनीचा सत्कार करण्यात आला. प्रा.मधुकर पाटील यांचे समाज प्रबोधनपर व्याख्यान झाले.

खंबाटकी कॅनॉलजवळील माळरानात तरुणास बेदम मारहाण

खंडाळा : बुधवार दिं.१० रोजी दोन अज्ञात युवकांकडून पेशाने चालक असलेल्या खंडाळ्यातील एका युवकास बदली देतो सांगत खंबाटकी पायथ्याला असलेल्या कॅनलजवळील माळरानात घेऊन जात बेदम मारहाण केल्याची घटना घडली.

याबाबत खंडाळा पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, बुधवारी दुपारी एकच्या सुमारास दीपक मोहन वायदंडे (व्यवसाय-चालक, वय- ३५वर्षे, रा.ता.खंडाळा,जि. सातारा) यास बदली चालक म्हणून जायचे आहे असे सांगत दोन अज्ञात युवक खंडाळा शहरातून दुचाकीवरून घेऊन गेले.

दरम्यान, कॅनॉलजवळील निर्जनस्थळी घेऊन जात या अज्ञातांच्या घरातील मुलीशी वाद झाल्याच्या कारणातून दीपकला मुलीची फोनवरून माफी मागण्यास सांगितली. संपूर्ण शरीरावर चामडी पट्ट्याने व निरगुडीच्या काठीने दीपकला गंभीर मारहाण करण्यात आली तसेच त्याला नग्न करून मोबाईलमध्ये चित्रीकरण करत तू पुन्हा खंडाळ्यात दिसायचे नाही अशी धमकी देण्यात आली. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या युवकावर सिविल रुग्णालय सातारा या ठिकाणी उपचार चालू आहेत.

याप्रकरणी दीपक वायदंडे याने दिलेल्या फिर्यादीवरून खंडाळा पोलीस ठाण्यात दोन अज्ञात युवकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक सुनील शेळके करत आहेत.

गैरसमजातून भावाला लोखंडी पाईपने मारहाण

सातारा : गैरसमजातून भावाने भावाला लोखंडी पाईपने मारहाण केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. अकरा रोजी अमर लक्ष्मी, सातारा येथील एका सलून दुकानाच्या समोर आईची पेन्शन खातो, या गैरसमजातून दीपक रामचंद्र माने रा. शिवनगर, अमरलक्ष्मी, कोडोली सातारा यांना लोखंडी पाईप ने मारहाण केल्याप्रकरणी अरुण रामचंद्र माने रा. नगरपालिकेसमोरील इमारत, सातारा यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार भिसे करीत आहेत.